# बृहन्मुंबई महानगरपालिका

अनुज्ञापन अधीक्षक यांचे कार्यालय,
श्री. छत्रपती शिवाजी महाराज मंडई इमारत,
४ था मजला, माता रमाबाई आंबेडकर मार्ग,
मुंबई- ४०० ००१.
फॅक्स : २२६१७६५३
विभाग : जाहिरात
संदर्भ : अअ/१२०५१ /जाहिरात

परिपत्रक क्र.अअ/१०, सन २००९-१०

दिनांक : २३.१२.२००९

**विषय :** **मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम ३२८/३२८ए अन्वये जाहिरात प्रदर्शित करण्यासाठी देण्यात येणा-या परवान्यांची सुधारित शुल्कसूची.**
**संदर्भ :** **महापालिका ठराव क्र. ९९९ दि. ११.१२.२००९.**

मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम ३२८/३२८ए अन्वये जाहिरात प्रदर्शित करण्यासाठी देण्यात येणा-या परवान्यांची शुल्कसूची सुधारित करण्याकरिता महापालिकेने दिनांक ११.१२.२००९ रोजी महापालिका ठराव क्रमांक ९९९ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन)/मुख्य लिपिक (महसूल) यांना याद्वारे निर्देश देण्यात येतात की, सदर सुधारित शुल्कसूची दिनांक १ जानेवारी २०१० ते ३१ डिसेंबर २०१० या कालावधीकरिता प्रभावी असून पुढील प्रत्येक वर्षाकरिता (जसे १ जानेवारी २०११ ते ३१ डिसेंबर २०११ च्या कालावधीकरिता) १०% वाढीव दराने आकारावयाचे आहे, याची नोंद घेण्यात यावी व त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी.

अनुज्ञापन अधीक्षक

प्रत : माननीय महानगरपालिका आयुक्त / माननीय अति.आयुक्त ( )
/ माननीय उप आयुक्त ( )
**कृपया माहितीकरिता सविनय सादर.**

**प्रत : मुख्य लेखा परिक्षक / उप प्रमुख लेखापाल ( )**
**माहितीकरिता सादर.**

**प्रत : सहाय्यक आयुक्त _________ विभाग/वरिष्ठ निरीक्षक /(अनुज्ञापन) _______ विभाग**
**मुख्य लिपिक (महसूल)__________ विभाग/लेखा अधिकारी _________ विभाग**

माहितीकरिता व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.

प्रत : उप संचालक (माहिती व तंत्रज्ञान)

कृपया सदर शुल्कसूची दिनांक १ जानेवारी २०१० पासून अंमलात येत असल्यामुळे परिपत्रकासोबत जोडण्यात आलेल्या जाहिरात परवान्यांच्या सुधारित शुल्कसूचीचा सॅप प्रणालीत त्वरित अंतर्भाव करण्यात यावा. कृपया ही बाब महसूलाशी संबंधित असल्यामुळे अत्यंत तातडीची समजावी.

अनुज्ञापन अधीक्षक

\\L4\e\CIRCLARS\2009-2010\Cir.SL-10 revised schedule 2010 (Advt).doc

# गट 'ख' — व्यावसायिक जागेवरील वा जागेतील जाहिराती

| अ. क्र. | प्रचलित वर्णन | अनुज्ञापन शुल्काचे परिमाण | शुल्क दर दरमहा (रुपयामध्ये) अ वर्ग | ब वर्ग | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्रचलित दर | प्रचलित दर | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ७ |
| | **व्यावसायिक जागेवरील वा जागेतील परिसरातील जाहिरात गट ख** | | | | **'ब'** प्रवर्गाऐवजी गट **'ख'** असा बदल सूचविण्यात आला आहे. |
| १) | प्रकाशित नामफलक आकाशचिन्हे, ग्लो साईन आणि निऑन साईन, शोकेस, शोरुम **आणि प्रामुख्याने मॉल्सवर प्रदर्शित होणा-या इतर प्रकाशित जाहिराती** | १) पहिल्या १ चौ.मी. करिता<br>२) पुढील प्रत्येक वाढीव १ चौ.मी. करिता | ३००<br>२५० | २५०<br>२०० | **आणि प्रामुख्याने मॉल्सवर प्रदर्शित होणा-या प्रकाशित इतर जाहिराती** या बाबीचा अंतर्भाव करण्यात आला आहे |
| २) | आकाशचिन्ह होणा-या अप्रकाशित जाहिराती **आणि प्रामुख्याने मॉल्सवर प्रदर्शित होणा-या इतर अप्रकाशित जाहिराती** | १) पहिल्या १ चौ.मी. करिता<br>२) पुढील प्रत्येक वाढीव १ चौ.मी. करिता | १३०<br>९० | १००<br>६५ | **आणि प्रामुख्याने मॉल्सवर प्रदर्शित होणा-या अप्रकाशित इतर जाहिराती** या बाबीचा अंतर्भाव करण्यात आला आहे. |
| ३) | परवान्यांचे हस्तांतरण | | | | |
| | अ) कायदेशीर वारसांकरिता | | ६०० | ६०० | |
| | ब) कायदेशीर वारसांव्यतिरिक्त | | ३००० प्रति हस्तांतरण | ३००० प्रति हस्तांतरण | |

| | | |
|---|---|---|
| १) | **प्रवर्ग अ -** प्रवर्गातील विभाग परिमंडळ | १) अे, सी, डी, जी/दक्षिण, जी/उत्तर, एच/पश्चिम, के/पश्चिम विभाग |
| | | २) सायन पासून जकात नाक्यापर्यंतचा पूर्व द्रुतगती महामार्ग |
| | | ३) माहीम पासून सहार रोड जंक्शनपर्यंत अलीयावर जंग मार्ग |
| | | ४) खोदादाद सर्कल पासून पूर्व द्रुतगती महामार्गाच्या जंक्शनपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग |
| २) | **प्रवर्ग ब -** प्रवर्गातील विभाग | बी, ई, एफ/दक्षिण, एफ/उत्तर, एच/पूर्व, के/पूर्व, पी/दक्षिण, पी/उत्तर, आर/दक्षिण, आर/उत्तर, आर/मध्य, एल, एम/पूर्व, एम/पश्चिम, एन, एस, आणि टी विभाग |
| ३) | अधिदान इ. चे नियम जोडपत्र-२ मध्ये दर्शविलेले आहे. | |